कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पं दे कृ वि., वणी रंभापूर.

जा. क्रं. / मप्राप्र /ता/ १८५८/२०२३ दिनांक: २४/११/२०२३

## निविदा सूचना

प्रती

--------------------------------
--------------------------------
--------------------------------

विषय: सन २०२३ - २४ करीता विविध विभागावर बिजोत्पादन क्षेत्रामधील प्रक्षेत्रावरील पिक राखणे कंत्राटी पध्दतीने करण्याच्या कामास कंत्राटी मजुर पुरविण्या बाबात...

संदर्भ : जा.क्र. वि.प्र / कृषिविद्या / शेती काम दर / 291 / 2023 दि. 31 / 5 / 2023.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, म.प्रा.प्र. वणी रंभापुर येथे सन २०२३ - २४ करीता रब्बी हंगामा मधील बिजोत्पादन क्षेत्रामध्ये प्रक्षेत्रावरील पिक राखणे करण्यात येणा-या दैनदिन कामाकरीता खालील तक्त्यात नमुद केलेल्या कामाप्रमाणे बाहेरील कंत्राटी दाराकडुन खालील दिलेल्या पत्त्यावर दिनांक ४/१२/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहरबंद लिफाफयात निविदा मागविण्यात येत आहे.

प्रक्षेत्रावरील पिक राखणे करण्यासाठी प्रति हेक्टर करीता

| अ.क्र. | करावयाचे काम | तपशिल | कंत्राटीदाराचे दर रूपये |
|---|---|---|---|
| १. | प्रक्षेत्रावरील पिक राखणे | १० हेक्टर क्षेत्र व ऐक दिवसा करीता | |

सोबत जोडलेल्या प्र-पत्रात तपशील प्रमाणे दिनांक ४/१२/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लीफाफामध्ये संबंधीत दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

अटी व शर्ती

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.
२. निविदा / कोटेशन मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.
३. कंत्राटी पध्दतीने मजूर लावण्याची व्यवस्था संबधित निविदा धारकांनी करावी
४. कंत्राटी पध्दतीने मजूर लावण्याची संपूर्ण जवाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
५. म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालय व विभागावरील असलेल्या संपूर्ण परिसरातील देखरेख करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.
६. कंत्राटी पध्दतीने मजूर यांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
७. कंत्राटी पध्दतीने मजूर लावतांना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमाचे तंतोतत पालन संबधित निविदा धारकाना करावे लागेल.
८. विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबावतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी /मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पं.दे.कृ.वि, यांचा राहील व तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.
९. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बावत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
१०. कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील
११. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बावतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावे .

१२. निविदा सुचनाची छायांकित प्रत कडून निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१३. कंत्राटी दाराने निविदा सादर करतांना संस्थेचे नोंदणी पत्र, भविष्यनिर्वाह निधी पत्र, विमा सुरक्षा पत्र, मागील तिन वर्षाचे जी.एस.टी. भरणा केल्याचे पत्र,पॅन कार्ड व आयकर विवरण पत्र या दस्ताऐवजासह सीलबंद देण्यात यावे.

१४. कंत्राटी दाराने विविध कामाकरीता लावण्यात आलेल्या कंत्राटी मजुरांची व त्यांच्या कामाची व्यवस्था ही कंत्राटी दारानेच पाहण्यात यावी काम समाधानकारक पुर्ण असल्यास देयके पारीत करण्यात येईल.

१५. निविदा प्रक्रियेतील निविदा मंजुर करण्याचे अधिकार पुर्णताहः म.प्रा.प्र. वणी रंभापुर कार्यालयाने राखुन ठेवलेले आहे व ती अट निविदा धारकास बंधनकारक राहील.

१६. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचारांण्या किमान वेतन विमा, संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेश पद्धतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या ५००/- स्टंप पेपर वर करारनामा मध्ये देण्यात यावा.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर करण्यात याव्या

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर